शासकीय विभागांकडून वस्तु खरेदी करताना अवलंबावयाची कार्यपध्दती - खरेदी नियम पुस्तिका सुधारित करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीची अंतरीम शिफारस क्रमांक-1.

महाराष्ट्र शासन,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय, क्रमांक भांखसं-1093/(2659)/उद्योग-6,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक: 22 फेब्रुवारी 1994.

वाचा:- (1) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखसं-1088/(2512)/उद्योग-6, दिनांक 2 जानेवारी 1992.

(2) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखसं-1093/(2643)/उद्योग-6, दिनांक 9 जून 1993.

प्रस्तावना:- संदर्भाधीन दिनांक 2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णयातील परिच्छेद 9(ग) व त्या अनुषंगाने विहित केलेल्या परिशिष्ट - नऊ मध्ये राज्यातील पुरवठादार व उद्योजक या संज्ञा वापरताना वेगवेगळे अर्थाविष्कार व श्लेष तयार होऊ लागले. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखसं-1093/(2643)/उद्योग-6, दिनांक 9 जून 1993 अन्वये शासनाने खरेदी नियम पुस्तिकेची सुधारित आवृत्ती तयार करण्यासाठी आयुक्त, अमरावती विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. या समितीने सदर प्रस्तावावर सखोल विचार करुन प्रस्तुत मुद्यांवरील संभ्रम दूर करण्यासाठी सुचविलेले खालील स्पष्टीकरण शासनाने स्वीकारले आहे.

शासन निर्णय

1.1. संदर्भाधीन दिनांक 2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णयातील परिच्छेद 9(ग) येथे नमूद केल्याप्रमाणे यावेळी राज्याबाहेरील पुरवठादार व राज्यातील पुरवठादार (उद्योजक धरुन) यांनी निविदांमध्ये एकत्र भाग घेतले असतील अशा वेळी, सदर शासन निर्णयाच्या परिशिष्ट - नऊ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सूत्र वापरुन किंमतीतील साधर्म्य ठरवायचे आहे. परिशिष्ट - नऊ मधील सूत्रानुसार जर महाराष्ट्रातील पुरवठादारांचा (उद्योजक धरुन) दर निम्नतम ठरला तर राज्यातील पुरवठादाराला त्यांनी नमूद केलेल्या दराने 100% पुरवठा आदेश देण्यात यावे.

1.2. अशी तुलना करताना, परिशिष्ट-नऊ मधील सूत्र वापरुनसुध्दा जर राज्याबाहेरील पुरवठादारांचा दर निम्नतम ठरला तर, परिच्छेद 9(ग) येथे नमूद केल्याप्रमाणे, निम्नतम दर नमूद करणा-या राज्याबाहेरील पुरवठादाराला 50% पुरवठा आदेश देण्यात यावेत. उर्वरित 50% पुरवठा आदेश निविदेत भाग घेणा-या महाराष्ट्रातील उद्योजकाला त्यांनी निम्नतम दराने समान दर्जाचा माल पुरविण्याची तयारी दर्शविली तर देण्यात यावेत.

1.3. वरील परिच्छेद 1.2. मध्ये नमूद केलेल्या परिस्थितीत महाराष्ट्रातील उद्योजकांपैकी कमी दराची वेदा भरणा-या उद्योजकाची क्षमताच जर कमी असेल तर हे पुरवठा आदेश अशा उद्योजकांच्या क्षमतेएवढे सीमित रहतील.

1.4. अशा राज्यातील उद्योजकांचा कमीत कमी दर एकापेक्षा अधिक उद्योजकांनी निविदेमध्ये सारखाच नमूद केला असेल तर अशा वेळी हे 50% पुरवठा आदेश समान भागामध्ये संबंधित उद्योजकांना विभागून द्यावेत.

1.5. वरील परिच्छेद 1.3. मध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्यातील कमी दर भरणा-या उद्योजकांना त्यांच्या क्षमतेएवढे पुरवठा आदेश दिल्यानंतर जर काही मागणी शिल्लक राहिली तर त्यापेक्षा अधिक दर निविदेमध्ये नमूद करणा-या महाराष्ट्रातील उद्योजकांचा क्रमशः विचार करण्यांत यावा. त्यांनाही निम्नतम दराने समान दर्जाचा माल पुरविण्याची अट लागू राहील. अशा रितीने राज्यातील उद्योजकांपैकी जर एखाद्या उद्योजकाने निम्नतम दराने समान दर्जाचा माल पुरवठा करण्यास लेखी नकार दिला तर वरील पध्दतीनुसार निविदेमध्ये अधिक दर नमूद करणा-या महाराष्ट्रातील इतर उद्योजकांचा त्यांच्या क्षमतेनुसार क्रमशः विचार करण्यात यावा.

1.6. राज्यातील निविदाकारांचा दर जर निम्नतम येत नसेल तर 50% पुरवठा आदेशाचा फायदा निविदेत भाग घेणा-या राज्यातील केवळ उद्योजकांनाच द्यावयाचा आहे.

1.7. काहीवेळा पुरवठादार महाराष्ट्रातील पत्ता दर्शवितात. ते पुरवठा करताना महाराष्ट्राबाहेरील पुरवठादारांकडून माल घेतात व त्यामुळे ते महाराष्ट्रातील विक्रीकर न आकारता केंद्रीय विक्रीकर आकारतात. अशा वेळी निविदाकारांनी केवळ पत्ता महाराष्ट्रातील दर्शविला म्हणून ते महाराष्ट्रातील निविदाकार होणार नाहीत. म्हणजे, जे निविदाकार महाराष्ट्रातील विक्रीकर भरत आहेत असेच निविदाकार हे महाराष्ट्रातील पुरवठादार किंवा उद्योजक संबोधले जातील.

1.8. परिशिष्ट-नऊ मधील सूत्र वापरताना त्यामध्ये जो "विक्रीकराचा दर" गृहित धरावयाचा आहे, तो शासकीय विभागांकडून खरेदी करताना वापरावयाच्या एएफ फॉर्मवर उपलब्ध होणारा सवलतीचा 4 टक्के दर होय.

1.9. काही वस्तुंच्या बाबतीत विक्रीकराचा "नोटिफाईड" दर हा एएफ फॉर्मवर उपलब्ध होणा-या सवलतीच्या 4% दरापेक्षाही कमी असतो. अशा वेळी सवलतीचा 4% दर न धरता, परिशिष्ट-नऊ मधील सूत्रासाठी, त्यापेक्षा कमी असलेला नोटिफाईड दर हिशोबाला धरुन परिशिष्ट-नऊ मधील गणित करावयाचे आहे.

1.10. काही शासकीय/निम शासकीय कार्यालये काही वस्तुंसाठी एएफ फॉर्म देऊ शकत नाहीत. व त्यामुळे त्यांना विक्रीकराचा सवलतीचा 4% दर उपलब्ध होत नाही. अशा वेळी निविदाकार सर्व समाविष्टित दर दर्शवितांना, त्यामध्ये विक्रीकराचा भाग किती टक्के दराने अंतर्भूत केला आहे ते दर्शवितात. हा विक्रीकराचा भाग 4% पेक्षा अधिक असेल तर अशा वेळी महाराष्ट्रातील निविदाकारांनी (उद्योजक धरुन) विक्रीकराचा जो भाग दरामध्ये अंतर्भूत केलेला असेल तो विक्रीकराचा भाग परिशिष्ट-नऊ मधील सूत्राचे गणित करताना वापरावा.

2. दिनांक 2 जानेवारी, 1992 च्या शासन निर्णयातील परिच्छेद 9 (ग) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, वरील तत्वानुसार पुरवठ्याचे आदेश विभागून देण्याचे अधिकार संबंधित सामान खरेदी समितीस राहतील.

3. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक: 11/94/करा-1, दिनांक 29 जानेवारी, 1994 अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सु. ब. वाड,

शासनाचे उप सचिव.

एम-1223(1200-3-94)-13.